# पदवीधरांनी पदवीधर मतदारसंघांमध्ये नाव नोंदणी करणे गरजेचे; संस्थापक-अध्यक्ष डॉ.के.एस.चौगुले



पदवीधर मतदार नोंदणी अभियानामध्ये मार्गदर्शन करताना डॉ.के.एस.चौगुले समवेत डॉ.यु.एन.लाड,डॉ.बी.एन.रावण,शिवाजीराव पाटील, डॉ.विजयकुमार पाटील, डॉ.उषा पवार, डॉ.एस.एस.कुरलीकर

पदवीधरांनी पदवीधर मतदारसंघांमध्ये नाव नोंदणी करणे गरजेचे आहे कारण या मतदारसंघातून निवडून गेलेल्या प्रतिनिधी मार्फत विधी मंडळामध्ये आपले प्रश्न सोडवता येतात यासाठी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांनी पदवीधर मतदार संघासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.के.एस.चौगुले यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व मतदार जागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पदवीधर मतदार नोंदणी अभियान प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.के.एस.चौगुले बोलत होते

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील,संचालक डॉ.अजय चौगुले,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण, सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मतदार जागृती समिती प्रमुख डॉ.यु.एन.लाड यांनी केले आभार डॉ.मनीषा सावंत यांनी मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.